जावक क्र.६५९४/२०१८.
लष्कर पोलीस ठाणे, पुणे.
दिनांक :- ०८/१०/२०१८.

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.

यांस सविनय सादर

प्रतिवेदक :- एल.बी.दाहोत्रे, सहा. पोलीस फौजदार, लष्कर पोलीस ठाणे, पुणे शहर
विषय :- बेवारस मयत इसमाची बातमी वृत्तपत्रात प्रसारीत होणेबाबत...
संदर्भ :- लष्कर पोलीस ठाणे अ.म.र.नं. - ४५/२०१८ सी.आर.पी.सी. कलम १७४ अन्वये

महोदय,

उपोरक्त विषयान्वये सविनय सादर करतो की, लष्कर पोलीस स्टेशन अकस्मात रजि. नं.४५/२०१८ सी.आर.पी.सी. कलम १७४ मधील बेवारस मयत इसम नाव पत्ता माहीत नाही, वय अदांजे ६० वर्ष, हा दिनांक ०२/१०/२०१८ रोजी सकाळी ०९/०० वा. पुर्वी ससुन हॉस्पीटल पुणे वार्ड नं १८ येथे उपचार चालु असताना मयत झाला असुन त्याचे एम.एल.पी.एम.नं. ४९७२/२०१८ अन्वये पोस्ट मार्टेम झाले आहे. त्याचे नातेवाईकाचा तपास होणेकामी बॉडी तीन दिवस शवागृहात ठेवण्यात आली आहे.

**मयताचे वर्णन खालीलप्रमाणे,**

एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ६० वर्ष, नांव पत्ता माहित नाही. रंगाने काळा सावळा, अंगाने सडपातळ अशक्त,चेहरा उभट,नाक सरळ, डोकीचे केस काळे पांढरे पुढील बाजुस टक्कल पडलेले, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच, दाढी मिशा वाढलेल्या व त्या पांढ-या झालेल्या जवळ मौल्यवान चिजवस्तुनाही त्याची ओळख पटण्यासारखी कोणतीही वस्तु वा कागदपत्र मिळुन आले नाही.

तरी वर नमुद वर्णनाचा बेवारस मयत इसमाची ओळख पटविण्याकरीता किंवा त्याचे नातेवाईकांचा शोध घेण्याकरीता सदर मयत बेवारस इसमाचे वर्णन व फोटो वृत्तपत्रात प्रसिध्द होणेस विनंती आहे.

मा. सवियन सादर
Dahotre
(एल.बी.दाहोत्रे)
सहा. पोलीस फौजदार,
लष्कर पोलीस ठाणे, पुणे शहर.